
Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta
Prakashan

Scanned by CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II



| लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|
| ग्रामीण साहित्याचे स्वरुप (संदर्भ - वेदनेचा गाव)<br>**प्रा. गजलवार रमाकांत काळबाराव**<br>**प्रा. कातकडे केशव श्रीरंग** | १-६ |
| नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा<br>**प्रा. ममता राऊत** | ७-११ |
| शेतकऱ्यांचे हिरवे दुःख : अवकाळी विळखा<br>**भारत चिंतामणी बंडगर** | १२-१८ |
| १९९० नंतरच्या निवडक ग्रामीण कादंबरीची आशय सूत्रे<br>**प्रा. राधाकिसन पांडूरंग मुठे** | १९-२१ |
| ग्रामीण कथासंग्रह कोंबऱ्या (लेखक - बा. सी. जठार)<br>**डॉ. संजय शामराव पाटोळे** | २२-२८ |
| दलित आत्मकथा : संकल्पना व स्वरूप<br>**डॉ. युवराज धबडगे**<br>**राहूल संभाजी पंडित** | २९-३१ |
| अरुण काळे यांच्या कवितेतील जागतिकीकरणाचे प्रतिबिंब<br>**प्रा. अरविंद आसाराम भराडे** | ३२-३४ |
| ग्रामीण साहित्य : १९६० नंतरची ग्रामीण कविता आणि सद्यस्थितीतील ग्रामीण कवितेचे चित्रण<br>**प्रा. गायकवाड मारोती गोविंदराव** | ३५-३९ |
| दलित कांदबरीतील वैचारिक लेखन<br>**राजनंदिनी कैलास भालेराव** | ४०-४५ |
| औरंगाबाद शहरातील उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा संविधानातील मानवी अधिकार विषयक जागरुकतेचा अभ्यास<br>**रेखा केशवराव बावणे**<br>**डॉ. मोईन फातेम** | ४६-५० |
| मराठवाड्यातील दलित कवितेची सद्यस्थिता<br>**प्रा. राजा जगताप** | ५१-५७ |





Scanned by CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १९९० नंतरच्या निवडक ग्रामीण कादंबरीची आशय सूत्रे

**प्रा. राधाकिसन पांडूरंग मुठे**
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

1960 नंतर मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले त्यापैकी ग्रामीण साहित्य प्रवाह हा महत्वाचा प्रवाह मातला जातो. कारण या साहित्य प्रवाहाच्या माध्यमातून प्रथमच तेथील ग्रामीण जीवन तेथील निसर्ग, शेतकरी, पशू इ. संदर्भात सखोल व वास्तवपूर्ण दर्शन साहित्याच्या पातळीवर उमटू लागले. कारण या कालखंडात लेखन करणारी बहुतांशी पिढी प्रत्यक्ष ग्रामीण जीवन जगलेली, अनुभवलेली होती. त्यामुळे त्यांच्या लेखनाला वास्तवतेचा परिस्पर्श होता. या मध्ये विशेषता आनंद यादव, उध्दव शेळके, रा.र.बोराडे, राजन गवस, विश्वास पाटील, सदानंद देशमुख इ.लेखकांनी ग्रामीण साहित्यामध्ये कसदार लेखन केले आहे. परतू 1990 नंतर ग्रामीण साहित्यामध्ये जागतिकीकरणाचा येथील औद्योगीकरणाचा, ग्रामीण व्यवस्थेवर झालेला दुरगामी परिणाम त्यातून निर्माण झालेले प्रश्न सामाजिक समस्या, आर्थिक, शैक्षणिक, बेरोजगारी या सारखे असंख्य प्रश्न मराठी कादंबरीच्या आशयाच्या केंद्रस्थानी येताना दिसून येतात. या अनुषंगाने विचार केल्यास काही निवडक ग्रामीण कादंबरीची आशय सूत्रे ही ग्रामीण जीवनातील अनेक प्रश्नांना थेट भिडताना दिसतात.

**"झाडा झडती"** ही कादंबरी 1991 ला प्रसिध्द झाली. साहित्य अकादमीसह अन्य पुरस्कार या कादंबरीला मिळाले. आजच्या आधुनिक काळातील प्रश्न या कादंबरीने अधोरेखित केले आहे. नदयांवर मोठ मोठी धरणे बांधून शेतीला पाणी पुरविले जाते. साखर कारखाने उभे करून सहकाराच्या नावाखाली राजकारण खेळले जाते. मोठया धरणांमुळे गावेच्या गावे उठविली जातात. त्यांना आपले संसार पाठीवर उचलून घेऊन गावोगाव हिंडावे लागते. कोणत्या गावात राहावे लागेल हे निश्चित सांगता येत नाही विश्वास पाटील यांनी झाडा झडती या कादंबरीत धरणग्रस्तांच्या जीवनाची होणारी पडझड अनेक बारीकसारीक तपशिलांची पेरणी करीत त्यांचे जीवन व्यापक पटावर मांडले आहे. एकुणच "झाडा झडती" ही कादंबरी ही धरणग्रस्तांच्या जीवनाचा व्यापक पट उलगडणारी शोकात्मक कहाणी आहे.

**"पांगिरा"** या कादंबरीत विश्वास पाटील यांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव मांडले आहे. भ्रष्टाचार ही समाजाला लागलेली कीड आहे. आज प्रत्येक गावागावात ग्रामपंचायत मार्फत चाललेला कारभार हा सरळपणे चालत नाही. या ठिकाणी माणूस सत्तासंपत्तीच्या जोरावर स्वताःचा स्वार्थ साधत असताना गावाला पोखरत निघाला आहे. गावच्या आणि सहकारी योजनेतून भ्रष्टमार्गाने जेवढेपैसे मिळविता येतील तेवढे स्वताःची तुंबडी भरण्यासाठी उकळतो. सगळया गावात साकोजीराव सारखे भ्रष्ट वारसदार आहेत. एकूणच विश्वास पाटील यांनी पांगिराच्या रूपाने ग्रामीण जीवनाचे बदलते वास्तव मांडून कादंबरीचा नवा मापदंड निर्माण केला. बदलत्या ग्रामव्यवस्थेत ही माणसे कशी वागतात त्याचेही चित्र त्यांनी मांडले आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाचे वर्तमान वास्तव मांडणाऱ्या या कादंबरीचे स्थान मराठी कादंबरी विश्वात अत्यंत महत्वाचे आहे.

**"तणकट"** राजन गवस यांनी, कविता, कथा, कादंबरी या वाङःमय प्रकारात सातत्याने दर्जेदार लेखन केले आहे. प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर कादंबरी लेखन करणारे आघाडीचे कादंबरीकार म्हणुन त्यांनी मराठी साहित्यात



Scanned by CamScanner

ओळखले जाते 'तणकट' कादंबरीत ग्रामीण जीवनाच्या राजकारणातील मूल्यभ्रष्टता मांडली आहे. वर्तमान ग्रामीण जीवनात राजकारणाचा दिशाहीन चाललेला प्रवाह मांडला आहे. ग्रामीण जीवनात सहकारी संस्थाचे जाळे विणले जात आहे. काही काळ त्याचा फायदा हा सर्वसामान्य माणसाला होताना दिसत होता मात्र या संस्थाच्यामध्ये भ्रष्ट व्यवहार करणाऱ्या माणसांची घुसखोरी वाढत आहे. त्यामुळे पर्यायाने सामान्य माणसाचे शोषण होत आहे. याचे ही वास्तव चित्रण या कादंबरीत राजन गवस यांनी केले आहे.

**'बारोमास'**– सदानंद देशमुख यांनी आपल्या साहित्यातून ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांचे प्रश्न, व्यथा, वेदना, मांडल्या आहेत. 'तहान' 'बारोमास' या कादंबऱ्यातुन ग्रामीण जीवनातील प्रश्न हाताळले आहेत. आजच्या वर्तमान परिस्थितीत शेतकऱ्याला ज्या प्रतिकुल परिस्थितीतुन वाटचाल करावी लागते ज्या प्रसंगाना आणि आव्हांनाना सामोरे जावे लागते ती आव्हाने या कादंबरीत अधोरेखित केले आहेत.

शेतकऱ्यांची मुले उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडतात. त्यानंतर त्यांना शिक्षण क्षेत्रातील नोकरीच्या ठिकाणी डोनेशनसाठी अडकून राहावे लागते. त्यामुळे आयुष्यभर बेकारीची टांगती कुऱ्हाड डोक्यावर घेऊन जगणारी आजची ही तरूण पिढी आहे. 'बारोमास' कादंबरीत पारंपारिक शेती आणि आज शिक्षण घेऊन बेकार बनलेला तरूण हा जेव्हा शेती करायला लागतो तेव्हा त्याची शेतीकडे पाहाण्याची दृष्टीबदलते त्याचबरोबर शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, सावकाराच्या कर्जाने आत्महत्या करणारा शेतकरी हे सर्व भयावह करून सोडणारे वर्तमान वास्तव सदानंद देशमुख यांनी मांडले आहे. एकूण या कादंबरीचे आशय सूत्रातून शेतकऱ्याचे न संपणारे दुःख मांडले आहे. तसेच लहरी निर्सगावर अवलंबून असलेली शेती ही शेतकऱ्याला अस्थिर करून कशी सोडत याचे चित्र मांडले आहे.

**'साखरफेरा'**–मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीत ऊस शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले आहेत पहिल्या पिढीतील सहकाराच्या जाणकारांनी सहकारी साखरकारखाने उभे केले सहकाराच्याद्वारे लोकांची त्यांनी प्रगती केली परंतु सहकारावर मूठभर लोकांची मक्तेदारी बनली. ही मक्तेदारी पिढयानपिढया तशीच पुढे सरकत आहे. त्यामध्ये या साखरकारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न, शोषण होत आहे. कारख्यानांचे चेअरमन आणि संचालक मंडळ मिळेल तेवढा पैसा उचलत राहतात. अनेक भ्रष्ट व्यवहार केल्यामुळे कारखानेच बंद पडण्याच्या वाटेवर आले आहेत. सहकारातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण या कादंबरीच्या आशयसूत्रांच्या मध्यवर्ती येते. तसेच 'साखर फेरा' या कादंबरीत सहकारी साखर कारखान्यात साखर सम्राटांनी आपली स्वतःची मक्तेदारी कशी निर्माण केली आहे त्याचे वास्तव चित्र मांडले आहे. एकूणच ऊस शेतकऱ्यांचा ज्वलंत प्रश्न, सहकारातील वर्तमान वास्तव हे या कादंबरीतल आशयसुत्र दिसून येतात.

**'गावठाण'** – कृष्णात खोत यांची कादंबरी या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म आणि तपशिलवार चित्रण केले आहे गावठाणच्या कथासूत्रामध्ये आनंदी ही व्यक्तीरेखा केंद्र स्थानी असून तिचे संघर्षमय जगणे या कादंबरीत मांडले आहे. दुगर्म भागातील चित्रण पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या दुर्गम खेडयाचे चित्रण 'गावठाण' मध्ये कृष्णात खोत यांनी केले आहे. तसेच प्रतिकुल वातावरणाशी संघर्ष करणारी माणसे त्यांच्या भावविश्वासह व्यक्त होतात. अल्पभुधारक असणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला भवितव्याच्या दृष्टीने कोणताच आधार दिसत नाही. एकूणच आजच्या स्पर्धेच्या युगात त्यांना भाग घेणे शक्य नसते त्यांच्यापुढे जगणे आणि टिकून राहणे हा प्रश्न महत्वाचा असतो. तसेच कादंबरीतून ग्रामीण जीवनातील स्त्रीच्या जीवनाला पडलेल्या मर्यादा ही अधोरेखित होतात. तसेच



Scanned by CamScanner

एकीकडे परिस्थितीला शरण न जाता जिद्दीने जीवनाला सामोरी जाणारी स्त्री आपल्याला गावठाण मध्ये भेटते. अशी अनेक आशयसूत्रे या कादंबरीत दिसून येतात. त्यामुळे 'गावठाण' ही कादंबरी ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविते. तेथील वास्तवाला अधोरेखित करते.

एकूणच 1990 नंतरच्या या काही निवडक कादंब–याची आशय सूत्रे बघितलीतर लक्षात येते की मराठी ग्रामीण कादंबरी ही अत्यंत संवेदनशील व ग्रामीण वास्तवाला भिडणाऱ्या कादंबऱ्या म्हणून मराठी साहित्य विश्वात वेगळ्या स्थान निर्माण करणाऱ्या सकसपणे ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या कादंबऱ्या म्हणून समोर येताना दिसतात. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

संदर्भ

1. 'पानिपत' – विश्वास पाटील आवृत्ती पहिली – 1988
2. 'बारोमास'– सदानंद देशमुख प्रथम आवृत्ती – 2002
3. 'पागिरा' – विश्वास पाटील – तिसरी आवृत्ती– 1999
4. 'तणकट' – राजन गवस – पहिली आवृत्ती – 1998
5. 'गावठाण' – कृष्णात खोत

Scanned by CamScanner